ISSN NO : 2230-7850 IMPACT FACTOR : 5.1651 (UIF) VOLUME :8, ISSUE : 7, AUG- 2018

INDIAN STREMS RESEARCH JOURNAL

# आंबेडकरी चळवळ

प्रकाश पवार
सहायक प्राध्यापक

**बौद्ध धम्माच्या नावाने चालणारी सामाजिकसांस्कृतिक परिवर्तनाची चळवळ आणि रिपब्लिकन नावाने - .इथेच मोठी गुंतागुंत झाली आहे आंबेडकरी चळवळीच्या समर्थकांमध्ये .चालणारी राजकीय चळवळ आजच्या चळवळीविषयी अभ्यासक आणि संशोधक काय म्हणतात,'ही चळवळ नसून एक** pressure Group **आहे.म्हणजे चळवळीचे रुपांतर ' दबाव गटात ' झाले आहे.सिध्दांताच्या आधारे अवलोकन केल्यास ही चळवळ 'चळवळ' म्हणण्यास पात्र ठरत नाही.ही एक जाती समूहाची चळवळ आहे.आरक्षण आणि अत्याचार या दोन विषयाभोवती चळवळ फिरत राहते.भावनिक विषयावर आरूढ झालेली चळवळ आहे.**

Leadership Crisis **बरोबर** participants **चा** Crisis **पण आहे.नेतेआणि कार्यकर्तेपणा गळाला लागतात.इतर पक्ष, संघटनांनी नेतृत्वाने व कार्यकर्त्यांचे मूल्य वा किंमत ठरलेली आहे.म्हणजेच( त्यांनी गृहीत धरले आहे.) बाबासाहेबांना** Narrative Mude **मध्ये (वर्णनात्मक प्रणाली) आणून ठेवले आहे.फक्त 'राजकारण 'केंद्रित तेही अस्मितेचे राजकारण करणारी चळवळ आहे. दलितेत्तर मंडळी जसे सण , उत्सव साजरे करतात तसे या चळवळीत एखादा प्रसंग वा घटना समोर करून फक्त अभिवादन करण्याचा रतीब सुरू झाला आहे. बहुतांशी तरुण पिढी ' सॅलरी पॅकेज ' मध्ये मग्न आहे. प्रायव्हेट वा कार्पोरेट सेक्टरमध्ये करिअर घडवण्यात मुलं मग्न आहेत. बाबासाहेबांच्या योगदानाची त्यांना तोंडओळख पण नाही. मध्यमवर्ग सार्वजनिक क्षेत्रात आरक्षण संपुष्टात आल्याने खाजगी क्षेत्रामध्ये आरक्षणासाठी लढतो आहे. दलित साहित्यिकांनी चळवळ हॅक केली आहे. ही चळवळ** Tired/exhausted **दमलेली/ क्षीण झालेली चळवळ असून, वर्तमानातील प्रश्न** Articulate **करण्यासाठी असमर्थ आहे. गतिरोध निर्माण झाला आहे. अभ्यासकांचे वरील निष्कर्ष महत्त्वपूर्ण आहेत** . याचे मुख्य कारण म्हणजे संविधान परिवारातील पक्ष हे या चळवळीचा वापर फक्त एका मर्यादेपुरता म्हणजे शिवसेनाभाजप युतीला निवडणुकीत पराभूत करण्यापुरताच - घेणे -दी यांना देणेसांस्कृतिक वा धार्मिक आशयांशी काँगेस वा राष्ट्रवा-या चळवळीच्या सामाजिक .करत राहिले डॉ.नव्हते बाबासाहेब आंबेडकर हे दूरदृष्टीचे समाजकारणी आणि . विचारवंत होते



या दीर्घकाळाच्या सहवासाची परिणती आंबेडकरी चळवळीचे वेगळेपण आणि अस्तित्व दुबळे होण्यात झाली . देशातील दलितांचा आणि दडपल्या गेलेल्या समूहांचा विकास वर कसा होईलजीवनाच्या सर्व पातळ्यां, याचा ते सातत्याने विचार करत असतयाचाच अर्थ असा की आंबेडकरी चळवळ ही . केवळ राजकीय चळवळ नाही, तर ती सामाजिक, सांस्कृतिक

आणि एका वेगळ्या अर्थाने धामिर्कदेखील आहे. त्यावेळी संघपरिवार व शिवसेना यासारख्या सांप्रदायिक आणि संविधानविरोधी भूमिका घेणाऱ्या पक्षांना रोखण्यासाठी आंबेडकरी चळवळीने 'संविधान परिवारा'त म्हणजे काँगेस वा राष्ट्रवादी काँगेसबरोबर राहण्याचा निर्णय घेतला .आंबेडकरी चळवळीचे वा तत्त्वज्ञानाचे साधारणीकरण करण्याचे प्रयत्न साधारणतनंतर केले गेले १९८० :. संघपरिवार भारतीय जनता पाटीर्च्या माध्यमातून धर्माच्या नावावर सक्रिय आणि आक्रमक झाला, तेव्हा 'संघपरिवार' आणि 'संविधान परिवार' अशा दोन शक्ती उभ्या करण्यात आल्यानी घेतलेल्या कृतिशील भूमिका यांचे त्यामुळेच त्यांचे विचार व तत्त्वज्ञान आणि त्यातून त्यां. अवलोकन हे राजकारण, समाजकारण आणि धम्मकारण अशा तीन स्तरांवर होऊ शकते .

आंबेडकरी राजकारणाचा विचारप्रवाह प्रखर व ताकदवान मानला जातो. धम्म हा धर्मातीत असला पाहिजे, तर त्यालाच एका पंथाचे स्वरूप आणून दिलेहिंदू धर्माचेच अनुकरण केले जाऊ बौद्धाच्या नावाने . लागले

आंबेडकरी चळवळ म्हणजे व्यवस्थेला प्रश्न विचारणारी चळवळ होय , हे वादातीत आहे .अन्याय, अत्याचार, भेदभावाविरुध्द लढा देणारी, आत्मभाव निर्माण करणारी, स्थिरतावत नसून बदलाभिमुखतेचा कार्यक्रम राबविणारी,मानवी मूल्यावर भर देणारी, समता , स्वातंत्र्य ,बंधुभाव व न्यायासाठी विद्रोह करणारी चळवळ अशी ओळख असणारी ही चळवळ आहे .शंभर वर्षांचा इतिहास असणारी ही चळवळ आहे. परिणामी या चळवळीने असंख्य चढउतार अनुभवले आहेत .

फलित नेमके काय आले? या चळवळीने सामान्य माणसांना कृतीप्रवण केले . सामुदायिकता निर्माण करून न्याय हक्कासाठी लढे उभारले . सामाजिक , राजकीय व सांस्कृतिक आघाड्यावरून समता प्रस्थापित करण्यासाठी लढे दिले . अनुयायांनी गावगाड्यातील पारंपारिक समाज व्यवस्थेतील निम्न दर्जाचे धंदे सोडून दिले . स्वाभिमान जागृत झाल्याने शिक्षण घेण्याची चिकाटी समूहात निर्माण झाली. क्रांतिकारी अस्मिता जागृत झाल्याने ' निश्चयात्मक दावा सांगणारी प्रवृत्ती 'ची बांधणी झाली . जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रामध्ये धबधबा निर्माण करणारी चळवळ म्हणजे आंबेडकरी चळवळ असे फलित दृष्टीस दिसते.त्याचबरोबर या चळवळीमुळे समूहात ' सामाजिक गतिशीलता निर्माण झाली ' हे महत्त्वाचे फलित म्हणून अधोरेखित केले पाहिजे .

पहिल्या एक - दोन पिढ्यांनी बाबासाहेबांच्या सुट्या- सुट्या योगदानावर भाष्य व लिखाण केले. त्यांनी बाबासाहेबांना 'वर्णनात्मक प्रणाली ' मध्ये आणून ठेवले .नंतर काही लेखकांनी समग्र बाबासाहेब मांडण्याचा प्रयत्न केला. बाबासाहेबांचे दुर्लक्षित पैलू जगासमोर प्रतिपादन करण्याचे कार्य तरुण लेखकांनी केले हे वादातीत आहे .इंग्रजी लिखाणामुळे बाबासाहेबांचे विचार जगाच्या पटलावर जाण्यात यशस्वी झाली आहे.इंग्रजी अभ्यासकांनी चळवळींवर खूप मूलभूत व मौलिक संशोधन केले आहे. या संदर्भात डॉ.एलिनार झेलिएट व गेल ऑमव्हेट यांच्या लिखाणाचा उल्लेख करणे उपयुक्त ठरेल. त्यांच्या लिखाणाचा पट डोळ्यांसमोर ठेवून तरुण पिढीने संशोधन केले आहे. त्यांचे कार्य प्रेरणादायी ठरलेले आहे . खऱ्या अर्थाने एलिनार व गेल यांच्या प्रभावी, सिद्धांत व अनुभवजन्य अभ्यासाने फुले - आंबेडकरी हे चळवळीची मुहूर्तमेढरोवली गेली. लिखाण जगमान्य झाले आहे .बाबासाहेबांच्या लिखाणाला visibility मिळाली.

भक्कम वारसा असणाऱ्या चळवळीची वर्तमानस्थिती फारच चिंताजनक व दोलायमान झाली आहे. फार मोठी संकटावस्था निर्माण झाली आहे. चळवळ का करायची? कोणाविरुद्ध चळवळ करायची? कुठचे माध्यम वापरायचे ? चळवळीचे उद्दिष्टे काय ? याविषयी सुस्पष्टता नाही. चळवळ करण्यासाठी आज साधन सामग्रीची रिसोर्स फार मोठी गरज आहे. सहभागाशिवाय चळवळीचा गाडा पुढे भेटता येत नाही. जागतिकीकरणाच्या युगात डेटा बँक, माहितीचे जाळे व समकालीन परिस्थितीचे आकलन करणे क्रमप्राप्त आहे. ज्या व्यक्तीकडे वा संस्थांकडे डेटा आहे त्यांना श्रीमंत समजले

जाते .यासोबतच सामाजिक व सांस्कृतिक कॅपिटल मानव साधन सामग्री, कौशल्य ,जालक्रम, विशेष निपुणता या बाबींना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे.ठराविक उद्दिष्ट व हेतू हस्तगत करण्यासाठी सामाजिक संबंधाचे जाळे निर्माण करणे गरजेचे आहे.समूहात घनिष्ठ सामाजिक संबंध निर्माण होणे अत्यावश्यक आहे .बंधूभावाची घडण होणे वर्तमान चळवळ यशस्वी करण्यासाठी आवश्यक आहे.

उपरोक्त बाबी आजच्या चळवळीकडे आहेत का? याचे सिंहावलोकन झाले पाहिजे. असंख्य चढ-उतारांना सामोरी गेलेली चळवळ आज थकीत अवस्थेत सापडली आहे . अशा अवस्थेमधून बाहेर येण्यासाठी काय करावे? सामान्य माणसांना विश्वासात घेऊन ' कृती - प्रवण ' केले पाहिजे .सामान्य माणसांना विश्वासाला चळवळ पात्र ठरली पाहिजे .प्रश्न सोडवण्यासाठी चळवळीने प्रतिनिधित्व केले पाहिजे .

आंबेडकरीकरणाची प्रक्रिया पुन्हा जोरकसपणे राबवावी लागेल. शिक्षणाच्या सर्व क्षेत्रांमध्ये बाबासाहेबांच्या विचारांचा जागर करावा लागेल. बालवाड्या, शाळा, महाविद्यालये, विद्यापीठातून, ग्रंथालयाच्या माध्यमातून विचारप्रणालीचा जाणीवपूर्वक प्रचार करणे अत्यावश्यक आहे .उजळणी वर्ग ,केडर कॅप घेऊन प्रबोधनात्मक विचारांची पेरणी करावी लागेल. शिका, संघटित व्हा व संघर्ष करा ही घोषणा व्यवहाराच्या पातळीवर राबविणे काळाची गरज आहे .Ambedkarisation ही प्रक्रिया मेरठ ,लखनौ, आग्रा व कानपूर जिल्ह्यात वेगाने राबविली जात आहे. दुसऱ्या पिढीतील सुशिक्षित तरुणात क्रांतिकारी जाणीव निर्माण झाली आहे .गैरराजकीय, सामाजिक , सांस्कृतिक माध्यमांचा वापर करून आंबेडकरी शाळा, आंबेडकर सुधार समिती, ग्रंथालये व महासभा स्थापन केल्या पाहिजेत. वस्ती, खेड्यापाड्यातून बाबासाहेबांच्या विचारांचे प्रसारण केले जात आहे. या प्रक्रियेमुळे दैनंदिन जीवनात नवी चेतना निर्माण झाली आहे, असे संशोधनातून पुढे आले आहे .तामिळनाडूमध्ये पण ही प्रक्रिया वेगात सुरू आहे . द्रविडीयन अस्मिता नाकारून 'दलित अस्मिता ' प्रस्थापित केली जात आहेत.

पंजाबमध्ये आंबेडकरीकरण या प्रक्रियेने जोर धरला आहे. गावगाड्यांमधील पारंपारिक काम करण्यास नकार, उच्च जातींपासून अंतर ठेवून वागणे व स्वतंत्र गुरुदार , स्मशानभूमी, शाळा, विवाह मंडप व स्वतंत्र गाव, खेडे ,वस्ती स्वतःच्या फंडातून उभी केली आहेत. या अनुभवाला संशोधकाने (J.N.U.) Dissociation, Distancing and Autonomy असे म्हटले आहे . या प्रक्रियेमुळे नवी जागृती व अआत्मभान अनुभवांत संचारले आहे. म्हणून महाराष्ट्रातील आंबेडकरवाद्यांनी उत्तर प्रदेश , तामिळनाडू व पंजाबमधील मंडळीकडून शिकण्यासारखे आहे. बिगर राजकीय माध्यमातून चळवळ उभी करण्याचा प्रयत्न सुरू आहे .आंबेडकरी समूहाला ' राजकारणात ' खूप रस आहे .फक्त राजकारण म्हणजे चळवळ नव्हे , हे अनेकदा सांगून लिहून बजावले आहे. महाराष्ट्रात बौद्धी संख्या ८० लाख अनुसूचित जाती मिळून संख्यांचे प्रमाण ९३टक्के,बौद्धांची टक्केवारी ०.०६ मग स्वतःच्या ताकदीवर स्वता हस्तगत कशी करायची. मुव्हमेंट पार्टी, चळवळ - पक्ष असं राजकारणाचे स्वरूप आहे. चळवळीतूनच पक्षांची निर्मिती झाली आहे. राजकीय सकारात्मक परिणामांसाठी चळवळ मजबूत करावी लागेल .मूलभूत प्रश्न घेऊन चळवळ केली तरच चळवळीस भविष्य आहे. आर.पी.आयच्या गटातटांचे ऐक्य हा भाबडेपणाचा विषय झाला आहे. जात व जातीच्या संघटनांना ऊत आला आहे. युतीच्या नादात दलितेत्तर पक्ष संघटना दलित नेत्यांना सहकार्य करतात. सर्वहारा समुदायांना ' सबअल्टर्न ' घेऊन व्यापक राजकारण करणे हिताचे ठरेल .'वंचित बहुजन आघाडी'चा प्रयोग आशादायक ठरावा .

अस्मितेचा अस्तित्वाचा पुन्हा प्रश्न ऐरणीवर येताना दिसत आहे. आंबेडकरी समुदाय ' बौद्ध, वंचित ,दलित ,महार व मुळनिवासी ' अशा अस्मिता घेऊन वावरताना दिसतो .दीक्षाभूमीला भेट देताना बौद्ध ,भीमा कोरेगावला गेल्यास महार व राजकारणात दलित बहुजन अशी आजची अवस्था आहे. दलित संकल्पना/ ओळख वापरू नका ? ही ओळख अपमानजनक derogation आहे , असे काही मंडळी आग्रहाने प्रतिपादन करीत आहेत. खरे तर दलित हा ' परिपेक्ष 'असून

व्यापक व सर्वसमावेशक आहे .या परिपेक्षाचा प्रवास आंतरराष्ट्रीय पातळी पर्यंत मान्यता प्राप्त झाला आहे .ओळख प्रस्थापित करण्यासाठी आणखी किती वेळ खर्च करायचा? शाब्दिक कोट्या आता करू नयेत , दलित पँथर, दलित साहित्य, दलित रंगभूमी, डिक्की या चळवळी व घटनांमधून अस्मिता वेगळी करता येईल का? या सर्व ऐतिहासिक चळवळी / घटना आहेत व आता इतिहास साक्षी आहे.

धर्मांतरामुळे भारतीय सामाजिक संरचनेला फार मोठा हादरा बसला आहे.चळवळीला कलाटने देणारा तो एक क्षण आहे. सामाजिक बदलाला गतिशीलता घडवून आणण्यासाठी धर्मांतराचा सिंहाचा वाटा आहे. या विषयावर विपुल संशोधन झाले आहे .वर्तमान स्थिती काय दर्शविते . या क्षेत्रात पण एक वाक्यता दिसत नाही. धम्माचा धर्म झाला आहे.कर्मकांड, पोथीनिष्ठता ,कर्मठता व कडवेपणा वाढीस लागला आहे. बुद्धविहारांचे नियंत्रण ठेवण्याचे चढाओढ लागली आहे.सेवानिवृत्त लोकांनी धम्म सहली काढण्याचा उपक्रम सुरू केला आहे. विपश्यना , ध्यान शिबिर व बिगर राजकीय संघटनांना खूप पिक आले आहे. विहारात गेल्याबरोबर येथे राजकारणावर बोलायचे नाही .अशी ताकद दिली जाते. पर्यायी मूल्य, विधी व रितीरिवाज, संस्कृती निर्माण झाल्याआहेत .म्हणूनच धम्माचा धर्म केला असे म्हणण्याला खूप आधार आहे .फक्त विवाह समारंभ, वास्तूप्रवेश व जलदान विधीप्रसंगी धम्म उपासकाला किंवा बौद्ध भिक्क्षुंकाना पाचारण केले जाते. धम्माचा योग्यरितीने प्रचार प्रसार होत नाही. आंबेडकरी चळवळीत जाती निर्मूलनाचा मुद्दा गांभीर्याने हाताळला जात नाही .आंतरजातीय विवाह फारसे होताना दिसत नाहीत .जातीअंतर्गत विवाहामुळे जातव्यवस्था टिकून आहे.जातीला धर्माचा आधार आहे .म्हणून पवित्र जाती व अपवित्र जाती अशी वर्गवारी निर्माण झाली आहे. आजमितीला जातीव्यवस्था 'एक व्यवस्था' म्हणून सिस्टीम राहिली नसून जातीची ताटता सैल होत आहे .तथापि सुट्या - सुट्या जाती बळकट होताना दिसून येत आहेत. आपापल्या जातीचे आयकॉन शोधून काढून आमची जात किती श्रेष्ठ होती व आहे, असे भासवण्याचा प्रयत्न होत आहे .म्हणूनच दलित ही 'Collective Identity म्हणून क्षीण होत आहे .अतिवृष्टी, भूकंप, सुनामी आली तरी जाती जमीनदोस्त होताना दिसत नाहीत, असा अनुभव आहे. मग ' ॲनिहिलेशन ऑफ कास्ट व्यवहारात कसे आणणार? होऊ घातलेल्या शिरगणतीमध्ये धर्मात बौद्ध धर्म लिहा व जातीच्या रकान्यात ' महार ' असे लिहा, असे सांगितले जाते .प्रशासनाच्या परिपत्रकामुळे नोकरदार वर्गांनी 'जात वैधता प्रमाणपत्र ' कार्यालयात सादर केले म्हणजे जात वैद्य झाली की नाही ? अण्णाभाऊंच्या 'घाव कुणी आणि कोठे घालायचा, ' ना जग बदलले ना जात ' उरली फक्त घोषणा .

गरिबांना प्रतिनिधित्व बहाल करण्यासाठी स्टेट मार्केट आणि सिव्हिल सोसायटी यांनी पुढाकार घेतला पाहिजे. कारण आपणास सर्वसमावेशक समाज निर्माण करणे आहे. राष्ट्र बळकट करणे आहे. आम जनता योग्य प्रतिनिधित्वासाठी स्टेटकडे आग्रह धरू शकते.

अन्याय ,अत्याचार कमी होण्याचे नाव घेत नाहीत. पुरोगामी महाराष्ट्रात सुद्धा जुजबी कारणावरून अत्याचार झाले आहेत. एखाद्या गोष्टीसाठी आम्ही पात्र आहोत entitlement अशी भावना लोकांच्या मनात निर्माण झाल्याने ते Assent व्हायला लागलेत.आत्मसन्मानाची भाषा बोलली जात आहे. ही मंडळी प्रत्येक आघाड्यावरून प्रश्न विचारत आहेत. आंतरजातीय विवाह झाल्यास 'ऑनर किलिंग ' च्या नावाने अत्याचार झाल्याचे आपण अनुभवले आहेत .चळवळ क्षीण झाल्याने अत्याचार वाढत आहेत, असे दिसते. कायद्याचा धाक व भीती लोकांमध्ये राहिली नाही. एनसीआरबीचे अहवाल बघा. गुन्हेगाराला शिक्षा होण्याचे प्रमाण किती नगण्य आहे, हे ध्यानात येईल .

दैनंदिन जीवनात लोक Assent म्हणजे ' निश्चयपूर्वक दावा ' करत आहेत . लोकशाही हक्कासाठी, पिण्याच्या पाण्यासाठी , गायरान जमिनीसाठी , स्वतंत्र स्मशानभूमीसाठी ,सामुदायिक साधन सामुग्रीमध्ये वाटा मिळवण्यासाठी , प्रभूजातीचे वर्चस्व नाकारून जातीच्या उतरंडीला मोडीत काढण्याचा प्रयत्न होत आहे. विद्यार्थी , महिला संघटनामधून

तसेच साहित्यामधून आंबेडकरी जनता Assert होत आहे. सामान्यजन , मध्यमवर्ग, राजकारणी व लेखक मंडळी व्यक्त होत आहेत.

तथापि चळवळीची वर्तमान स्थिती निराशाजनक आहे. चळवळीस Tired व Exhausted थकलेली , दमलेली चळवळ असे संबोधने योग्य ठरणार आहे .अर्थातच चळवळीकडे ठोस कृती कार्यक्रम नाही.Annihilation of Caste संबंधी कोणी बोलत नाही. सर्व क्षेत्रात Co -Option होत आहे. पर्यायी विकासाचे प्रारूप सांगणारा तज्ञ शोधून सापडत नाही . तरुण पिढीला चळवळीचे काही उत्तरदायित्व राहिले नाही . एखादा प्रसंग वा दिवस पुढे करून फक्त अभिवादन करण्याची फॅशन सुरू आहे. विजयादशमीला नागपूरला , २५ डिसेंबरला महाडला आणि ६ डिसेंबरला मुंबईला लाखो लोक अभिवादन करण्यासाठी जमतात .नंतर या जमावाचे काय होते हे समजत नाही . निवडणूक मग ती कुठची पण असो लोकांचे व्यवहार व भूमिका बघा .जयंतीच्या मोसमात सर्व प्रकारच्या व्यवस्थांची रेलचेल असते .जयंतीच्या निवडणुकीवर लाखो रुपये खर्च करणारी मंडळी आम्ही बघितली आहेत. बाबासाहेबांनी स्थापन केलेली पी.ई.एस.ची आज काय अवस्था आहे. नियंत्रण कोणी करायचे यावर तीव्र मतभेद आहेत.

वर्तमान चळवळीत खालील बाबींची चर्चा होणे अपेक्षित आहे. चळवळीचे संस्थाकरण , उठाव प्रवण परिपेक्ष,तळातून येणारा परिपेक्ष, आंबेडकरीकरणाची प्रक्रिया, आंबेडकरी संस्कृतीकरण ,नव सामाजिक चळवळींचे नाविन्य, बहु विध अस्मिता, दलित पुरुषसत्ता ,दलितिकरणाची प्रक्रिया , सामाजिक आणि सांस्कृतिक भांडवल, दलित संकल्पनेला एकत्र ठेवण्याची मर्यादा, दलित व्ही, सामाजिक वजन, अंतकेंद्रित नको तर वर्जनताच हवी म्हणणारे दलित (वाल्मिकी Broom Symbotion)दलित अंतर्गत संघर्ष (Sub Categorisation)

बौद्ध समूहाला एकत्रित ठेवण्यासाठीच Ethos धर्मांतरामुळे प्राप्त झाला आहे, असे एका संशोधकाने म्हटले आहे . मी एकटा नसून समुदायाचा सभासद आहे , ही भावना लोकांच्या मनात निर्माण झाली .या समुदायाला एकत्र ठेवण्यामागे (सांस्कृतिकदृष्ट्या ) ही Kinship कारणीभूत आहे.Kinship घट्ट व्हावी.

जागतिकरणाला आता ३०वर्षे झाली . याचा कुणाला फायदा झाला. खाजगीकरणाची प्रक्रिया वेगाने सुरु आहे. परिणामी , सार्वजनिक क्षेत्र आकुंचन पावले आहे.आरक्षण धोरण शिताफिने निकाली निघाले आहे.नोकऱ्या लाखोंच्या घरात आहेत. खाजगी क्षेत्र आरक्षण राबवत नाही . हजारोंच्या संख्येने विद्यार्थी पदवी प्राप्त करून बेरोजगार आहेत .७५ वर्षांमध्ये एससी/ एसटीचे प्रतिनिधित्व फारच कमी आहे .असे मत सर्वोच्च न्यायालयाने नोंदवले आहे . अलीकडे The God Market:How Globalisation is making India More Hindu '-Meera Nanda या अभ्यासाने एलपीजी मुळे कुणाचे भले झाले असेल तर ते हिंदू देव-देवता, त्यांच्या मंदिराचे भले झाले आहे, असे प्रतिपादन केले आहे .धर्माची बाजारपेठ जोरात सुरू आहे. असा निष्कर्ष मांडला आहे.

प्रत्येक क्षेत्रात Crisis आहेत .जटील परिस्थिती निर्माण झाली आहे .यातून मार्ग काढण्यासाठी Collective wisdom ची गरज आहे. लोकांना पुन्हा गतिशील, कार्यप्रवण करणे काळाची गरज आहे .लोकांचे Resocialization Cader Camp घेऊन चळवळीची नव्याने बांधणी करावी लागणार आहे .शिक्षण हाच आपली असेंट असल्याने शिक्षणात गुंतवणूक करणे शहाणपणाचे होईल . अत्याचार झाल्यानंतरच लोक रस्त्यावर येताना दिसतात .अत्याचारी केसेसचा पाठपुरावा होताना दिसत नाही. लोकांचे दैनंदिन जीवनातील प्रश्न घेऊन त्यांना आश्वासित करावे लागेल. आमच्या वेळेला नेता उपयोगी पडतो का ? असा प्रश्न ते विचारतात .या चळवळीत खूप ऊर्जा व क्षमता आहे. आंबेडकरी चळवळ म्हणजे लोकशाही बळकट करणारी चळवळ आहे .म्हणून लोकशाहीच्या गतीने पुढे नेण्यासाठी ही चळवळ शक्तिशाली व्हावी ही अपेक्षा . वैचारिक वारसा सांगणारी चळवळ टिकली पाहिजे. लोकांनी मनावर घेतले तर चळवळीस वैभवशाली पर्व पुन्हा सुरू होऊ शकते .

## संदर्भ ग्रंथ


१.तेलतुंबडे आनंद , 'सामाजिक न्याय आणि जागतिकीकरण ' लोकवाड्मय, मुंबई - तिसरी आवृत्ती -२०१४

२.थोरात सी. पी. ' पुणे करार, करार नाही तर तह , काय कमावले आणि काय गमावले ' - सुमेध प्रकाशन, पुणे -२००७

३.थोरात सुखदेव, ' खाजगी क्षेत्रातील आरक्षण विषयक वाद चर्चा 'सुगावा प्रकाशन, पुणे - प्रथमावृती -२०१५

४.फडके य. दि.,' राखीव जागांची शंभर वर्ष', - सुगावा प्रकाशन ,पुणे - प्रथम आवृत्ती १९८५

५.बसू दुर्गा दास,' भारतीय राज्य घटनेचेओळख' (मराठी अनुवाद) लेक्सिस नेक्सिस गुडगाव , हरियाणा - द्वितीय आवृत्ती २०१६

६.लद्दा उंटवाला वर्षा (संकलन) 'आरक्षण धोरण ' , डॉ. बाबसाहेब आंबेडकर सशोधन व प्रशिक्षण सस्था, पुणे- प्रथमावृत्ती २०१६

७.परिवर्तनाचा वाटसरू पाक्षिक ' 'वेध आंबेडकरी विचार व्यवहार', संपादक अभयकांता १६ ते ३१ मार्च २०१६